सत्यमेव जयते

राज्य निवडणूक आयोग
महाराष्ट्र

# राज्य निवडणूक आयोग

## महाराष्ट्र

१ ला माळा, नवीन प्रशासकीय भवन, हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा मार्ग, मुंबई- ४०० ०३२.

---

(प्रसिद्धिपत्रक) दि. ११ सप्टेंबर २०१८.

## शिरोळ नगरपरिषदेसाठी
## २१ ऑक्टोबरला मतदान

मुंबई, दि. ११ (रा.नि.आ.): कोल्हापूर जिल्ह्यातील नवनिर्मित शिरोळ नगरपरिषदेच्या पहिल्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी २१ ऑक्टोबर २०१८ रोजी मतदान; तर २२ ऑक्टोबर २०१८ रोजी मतमोजणी होणार आहे. त्यासाठी आजपासून आचारसंहिता लागू झाली असल्याची माहिती राज्य निवडणूक आयुक्त ज. स. सहारिया यांनी आज येथे दिली.

श्री. सहारिया यांनी सांगितले की, शिरोळ नगरपरिषदेच्या अध्यक्ष व १७ सदस्यपदांसाठी ही निवडणूक होत आहे. नामनिर्देनपत्रे २४ ते २९ सप्टेंबर २०१८ या कालावधीत दाखल करता येतील. नामनिर्देनपत्रांची छाननी १ ऑक्टोबर २०१८ रोजी होईल. नामनिर्देनपत्रे मागे घेण्याची प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर निवडणूक चिन्हांचे वाटप होईल. मतदान २१ ऑक्टोबर २०१८ रोजी सकाळी ७.३० ते सायंकाळी ५.३० या वेळेत होईल. मतमोजणी २२ ऑक्टोबर २०१८ रोजी सकाळी दहा वाजता सुरू होईल.

०-०-०

(Jagdish More, PRO, SEC)